## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३० ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत संगणक शास्त्र प्रशाळेच्या सेमिनार हॉलमध्ये "परिचय पत्र लेखन व मुलाखत तंत्र (Resume Writing & Interview Techniques)" या विषयावर दिनांक २८ जुलै रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत एमसीए, एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स आणि एम.एस्सी. आयटी विभागातील एकूण १०८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यशाळेसाठी कम्युनिकेशन अँड मॅनेजमेंट विषयाच्या प्रशिक्षक डॉ. सुमित्रा चव्हाण या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्यांचा विकास, प्रभावी परिचयपत्र तयार करण्याचे महत्त्व तसेच कॅम्पस मुलाखतींसाठी आत्मविश्वासाने तयारी करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी व्यावसायिक परिचय पत्राचे महत्त्व व उद्देश, एटीएस अनुकूल परिचय पत्र तयार करण्याची पद्धत, परिचय पत्र तयार करताना होणाऱ्या सर्वसाधारण चुका टाळण्याचे उपाय, मुलाखतीसाठी आत्मविश्वासपूर्वक तयारी, एचआर मुलाखतीतील सामान्य प्रश्नांची प्रभावी उत्तरे देण्याची तंत्रे तसेच मुलाखतीदरम्यान व्यावसायिक संवाद कौशल्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमसीए विभागाचे विभागप्रमुख व प्लेसमेंट समन्वयक प्रा. अजय पाटील होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्लेसमेंट अधिकारी सोनाली दायमा यांनी केले. ही कार्यशाळा केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्ज्वल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली. इंटर्नशिप समन्वयक श्री. संदीप कुमार तसेच केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या सर्व सहकाऱ्यांनी कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

**बातमी क्रमांक २**

जळगाव, दि. ३० ( प्रतिनिधी) : भौगोलिक अडचणी, नोकरी-व्यवसाय किंवा इतर कारणांमुळे उच्च शिक्षण अर्धवट राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत बहिःस्थ पद्धतीने पदव्युत्तर (PG) अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला १ जुलै २०२६ पासून सुरुवात झाली असून, नोकरी किंवा व्यवसाय सांभाळत पदव्युत्तर पदवी पूर्ण करण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे.

जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यांतील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक-युवती, गृहिणी, नोकरदार, व्यावसायिक तसेच निवृत्त व्यक्तींना या अभ्यासक्रमांचा लाभ घेता येणार आहे. नियमित महाविद्यालयात उपस्थित राहणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना विशेष उपयुक्त ठरणार आहे.

या विभागामार्फत राबविण्यात येणारा एम.ए. शिक्षणशास्त्र (M.A. Education) हा अभ्यासक्रम कार्यरत शिक्षकांसाठी विशेष महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र शासनाने या पदवीला एम.एड. (M.Ed.) समकक्ष मान्यता दिल्यामुळे माध्यमिक शाळांतील शिक्षकांना निवडश्रेणी (Selection Grade) तसेच पदोन्नतीसाठी या पदवीचा लाभ मिळणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) नव्या धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पदव्या पूर्ण करण्याची संधी उपलब्ध आहे. नियमित अभ्यासक्रमासोबत बहिःस्थ पद्धतीने दुसरी पदवीही घेता येणार आहे. सर्व अभ्यासक्रम NEP-2020 नुसार अद्ययावत करण्यात आले असून सत्र (सेमिस्टर) पद्धती लागू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे स्वयंअध्ययन साहित्य ई-कंटेंटच्या स्वरूपात उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच नोकरदार विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा हायब्रीड पद्धतीने समुपदेशन (Counselling) सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यांमध्ये परीक्षा केंद्रांची सुविधा उपलब्ध असून, प्रवेशापासून पदवी प्रदानापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन राबविण्यात येणार आहे. विद्यापीठाची पदवी असल्यामुळे विद्यार्थ्यांना पीएच.डी., एमपीएससी, यूपीएससी तसेच विविध सरकारी व खासगी नोकऱ्यांसाठी पात्रता प्राप्त होणार आहे. तसेच या प्रवेश प्रक्रियेत एम.ए. मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिकशास्त्र, शिक्षणशास्त्र तसेच एम.कॉम. हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

अपूर्ण राहिलेले उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी आणि शैक्षणिक प्रगतीची नवी संधी मिळवण्यासाठी या प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. मनीष जोशी यांनी केले आहे.

..................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: 30 जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता